# THE BOMBAY BHAGDARI AND NARWADARI TENURES ABOLITION ACT, 1949.

(Bom. XXXII of 1949.)

---

## मुंबईचा भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत अधिनियम, १९४९.

---

### अनुक्रमणिका.

प्रस्तावना.


| कलमें. | | पान. |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात ... ... ... ... ... | १४३३ |
| २. | भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहींसे करणें ... ... ... | १४३३ |
| ३. | भाग, नरवा किंवा मान्य केलेला पोट-विभाग याचा भाग असलेली जमीन धारण करणारे व मजमूनचा वैध रीत्या कबजांत असलेले इसम खातेदार आहेत असें समजणें ... ... ... ... | १४३३ |
| ४. | इतर सर्व मजमून जमीन व इतर मालमत्ता राज्य सरकारची मालमत्ता असणें. | १४३४ |
| ५. | आतांपर्यंत केलेले अन्य संक्रामण अवैध नसणें... ... ... ... | १४३४ |
| ६. | पुरुष वारसांमुळें स्त्री वारसांचा हक्क नष्ट होणें ही रूढि निरर्थक असणें ... | १४३४ |
| ७. | मान्य केलेल्या अन्य संक्रामणाचा बचाव ... ... ... ... | १४३४ |
| ८. | जमिनींतील कोणतेहि हक्क नष्ट करण्याबद्दल किंवा त्यांत बदल करण्याबद्दल नुकसानभरपाई देण्याची पद्धत ... ... ... ... | १४३५ |
| ९. | रद्द करणें ... ... ... ... ... | १४३५ |
| १०. | नियम ... ... ... ... ... | १४३५ |
| ११. | अर्थविवरण ... ... ... ... ... | १४३५ |

# सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२.

[ मुंबईचा भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९४९. ]

[ २३ जून १९४९. ]

ह्या अधिनियमांत पुढील आदेशाअन्वयें अनुकूलन व रूपभद करण्यांत आलें आहेत :—

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

## मुंबई प्रांतांतील भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत अधिनियम, १९४९.

ज्याअर्थी, मुंबई प्रांताच्या कांहीं भागांत चालू असलेले भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहींसे करणें व यांत यापुढें दिलेल्या कांहीं इतर गोष्टींसाठीं तरतूद करणें इष्ट आहे; त्याअर्थी, ह्याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

लघुसंज्ञा, व्याप्ति व सुरुवात.

१. (१) ह्या अधिनियमाला मुंबईचा भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहींसे करण्याबाबत अधिनियम, १९४९ असें म्हणावें.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य सरकार राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें जी तारीख निर्दिष्ट करील त्या तारखेस अंमलांत येईल.

भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार नाहींसे करणे.

२. हा अधिनियम अंमलांत येईल त्या तारखेपासून व त्या तारखेस—

(१) भागदारी व नरवादारी सत्ताप्रकार ज्या ज्या ठिकाणीं चालू असतील त्या त्या ठिकाणीं ते नष्ट झाले आहेत असें समजलें पाहिजे ;

(२) अशा सत्ताप्रकाराअन्वयें धारण केलेल्या कोणत्याहि जमिनीस लागू असलेल्या उक्त सत्ताप्रकारासंबंधींच्या सर्व आनुषंगिक गोष्टी रद्द झाल्या आहेत असें समजलें पाहिजे ;

(३) भागदारी व नरवादारी अधिनियम, १८६२, कलम ६ अन्वयें राज्य सरकारनें काढलेला कोणताहि जाहीरनामा रद्द झाला आहे असें समजलें पाहिजे.

भाग, नरवा किंवा मान्य केलेला पोट-विभाग याचा भाग असलेली जमीन धारण करणारे व मजमून वैध रीत्या कबजांत असलेले इसम खातेदार आहेत असें समजणें.

३. हा अधिनियम अंमलांत येण्याच्या निकटपूर्वी —

(१) भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भाग, नरवा किंवा हिस्सा यांत समाविष्ट असलेली कोणतीहि जमीन अथवा असा कोणताहि भाग, नरवा किंवा हिस्सा अथवा भाग, नरवा किंवा हिस्सा यांचा मान्य केलेला पोट-विभाग यांस अंगभूत असलेलें किंवा यांस जोडून असलेलें कोणतेंहि घरठाण, इमारतीची जागा (गभाण) किंवा जागा धारण करणारा प्रत्येक इसम, आणि

(२) भागदारी किंवा नरवादारी गांवांतील गाम किंवा पाटी मजमून याचा भाग असणारी कोणतीहि जमीन ज्याच्या वैध रीत्या कबजांत आहे असा प्रत्येक इसम,

त्याच्या कबजांत असलेल्या अशा जमिनीसंबंधानें मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ याच्या अर्थानुसार खातेदार आहे असें समजण्यांत आलें पाहिजे. व तो अशा जमिनीसंबंधानें येणें असलेला जमीन महसूल राज्य सरकारला देण्याबद्दल प्रथमत: जबाबदार असेल ; आणि त्यास उक्त अधिनियम किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला कोणताहि विधि यांअन्वयें खातेदार म्हणून अशा जमिनीसंबंधानें सर्व हक्क असतील व तो अशा जमिनीसंबंधानें असलेल्या सर्व जबाबदाऱ्यांस पात्र असेल.

तर सर्व मजमून जमीन व इतर मालमत्ता राज्य सरकारची मालमत्ता असणें.

४. शंकेचें निरसन व्हावें म्हणून याअन्वयें असें जाहीर करण्यांत येतें कीं, कलम ३, कंडिका (२) मध्यें उल्लेख केलेल्या जमिनीव्यतिरिक्त भागदारी किंवा नरवादारी गांवांतील गाम किंवा पाटी मजमून याचा भाग असणारी सर्व जमीन आणि भागदारी किंवा नरवादारी गांवांतील सर्व पडीत व शेतीच्या कामास न लावलेली जमीन व मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, कलम ३७ यांत उल्लेख केलेल्या इतर सर्व प्रकारच्या मालमत्ता, जर त्या कोणत्याहि व्यक्तीच्या किंवा मालमत्ता धारण करण्यास समर्थ असलेल्या व्यक्तींच्या कोणत्याहि समुहांच्या मालमत्ता नसतील तर, त्या अशा इसमांचे त्यांवर जे कोणतेहि हक्क प्रस्थापित करण्यांत येतील ते खेरीज करून आणि त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या विधींत जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून, त्यांवर असलेल्या किंवा त्यांच्या संबंधांत असलेल्या सर्व हक्कांसह राज्य सरकारची मालमत्ता आहे असें समजलें पाहिजे; आणि मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, याच्या यथास्थिति ३७व्या किंवा ३८व्या कलमांत तरतूद केलेल्या रीतीनें किंवा कारणांकरितां अधिकाऱ्यांस त्यांची विल्हेवाट लावतां येईल किंवा त्या अलग ठेवतां येतील आणि त्यांनीं तसें करणें हें विधिसंमत असेल.

आतापर्यंत केलेले अन्य-संक्रामण अवैध नसणें.

५. कोणत्याहि भागदारी किंवा नरवादारी गांवांतील भाग, नरवा किंवा हिस्सा यांच्या मान्य केलेल्या पोट-विभागाव्यतिरिक्त अशा गांवांतील कोणताहि भाग, नरवा किंवा हिस्सा किंवा त्यांस अंगभूत असलेलें किंवा त्यांस जोडलेलें कोणतेंहि घरठाण, इमारतीची जागा (गभाण) किंवा जागा यांचें हा अधिनियम अंमलांत येण्यापूर्वीं भागदारी व नरवादारी अधिनियम, १८६२, कलम ३ याच्या उपबंधांचें उल्लंघन करून केलेलें कोणतेंहि अन्य संक्रामण, अभिहस्तांकन किंवा तीं गहाण ठेवणें किंवा त्यांवर कोणताहि भार निर्माण करणें हा व्यवहार उक्त कलमाचें उल्लंघन करून करण्यांत आला होता याच केवळ मुद्यावर अवैध आहे किंवा केव्हांहि होता असें समजतां कामा नये :

परंतु, ज्याच्या नांवें असें अन्य संक्रामण, अभिहस्तांकन किंवा गहाण करण्यांत आलें असेल किंवा ज्याच्या फायद्यासाठीं असा भार निर्माण केला असेल त्या इसमाकडून अशा जमिनीचा कबजा काढून घेण्याबद्दल कलेक्टरनें किंवा इतर महसूल अधिकाऱ्यानें आदेश दिलेला असतां कामा नये आणि असा आदेश सक्षम न्यायालयानें हा अधिनियम अंमलांत येण्यापूर्वीं रद्द केलेला असतां कामा नये.

पुरुष वारसांमुळें स्त्री वारसांचा हक्क नष्ट होणें ही रूढि निरर्थक असणें.

६. कोणताहि भाग, नरवा अथवा भागदारी किंवा नरवादारी गांव अथवा असा भाग, नरवा किंवा गांव यास अंगभूत असलेलें किंवा त्याशीं जोडलेलें कोणतेंहि घरठाण, इमारतीची जागा (गभाण) किंवा जागा यांच्या वारसाहक्कासंबंधानें जर कोणतीहि रूढि, रिवाज किंवा प्रघात असेल व त्यामुळें संबंधित इसमांस लागू असलेल्या वैयक्तिक कायद्याविरुद्ध स्त्री वारसांचा वारसा-हक्क पूर्णतः नष्ट होत असेल किंवा असा हक्क अधिक दूरच्या नात्याच्या पुरुष वारसाच्या हितासाठीं नष्ट होत असेल तर, अशी रूढि, रिवाज किंवा प्रघात, जेथवर विरोध येत असेल तेथवर, हा अधिनियम अंमलांत येण्याच्या तारखेपासून व नंतर निरर्थक होईल व परिणामकारक असणार नाहीं असें समजण्यांत आलें पाहिजे.

मान्य केलेल्या अन्य संक्रामणाचा बचाव.

७. भागदारी किंवा नरवादारी गांवांतील कोणत्याहि जमिनीचें अन्य संक्रामण एखाद्या इसमाच्या नांवें करून देण्यांत आलें असेल व असें अन्य संक्रामण राज्य सरकारबरोबर केलेला खास करार किंवा त्या त्या वेळीं अंमलांत असलेला कोणताहि विधि यांच्या उपबंधांअन्वयें मान्य करण्यांत आलें असेल तर, अशा जमिनींतील अशा इसमाच्या हक्कांस जमीनमहसूल माफी (क्रमांक २) अधिनियम, १८६३, कलम ३ मधील कोणत्याहि उपबंधामुळें, बाध येणार नाहीं.

जमिनींतील कोणतेहि हक्क नष्ट करण्या-

८. (१) ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकीं कोणत्याहि उपबंधामुळें एखाद्या इसमाचे जमिनींतील हक्क नष्ट होऊन किंवा त्यांत बदल होऊन त्याचें नुकसान झालें असेल आणि असे हक्क नष्ट झाल्यामुळें किंवा त्यांत बदल झाल्यामुळें जमीन किंवा अशा जमिनीवरील कोणताहि हक्क

सार्वजनिक मालकीचा झाला आहे असें असा इसम सिद्ध करील तर, त्यास नुकसानभरपाई मिळण्यासाठीं कलेक्टरकडे अर्ज करण्याचा अधिकार आहे. बद्दल किंवा त्यांत बदल करण्याबद्दल नुकसान-भरपाई देण्याची पद्धत.

(२) असा अर्ज विहित केलेल्या नमुन्याप्रमाणें केला पाहिजे व तो हा अधिनियम अंमलांत आल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत केला पाहिजे.

(३) जमीन महसूल अधिनियम, १८७९ यांत तरतूद केलेल्या रीतीनें रीतसर चौकशी केल्या-नंतर, कलेक्टरनें, त्यास वाजवी व पुरेशी वाटेल अशी नुकसानभरपाई दिली पाहिजे. नुकसान-भरपाईची रक्कम ठरवितांना कलेक्टरनें भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) व कलम २४ यांच्या उपबंधांप्रमाणें चाललें पाहिजे. पोट-कलम (४) च्या उपबंधांस अधीन राहून, कलेक्टरचा निवाडा अखेरचा असेल.

(४) कलेक्टरच्या निवाड्यामुळें ज्याचें नुकसान झालें असेल अशा कोणत्याहि इसमास मुंबई महसूल न्यायाधिकरण अधिनियम, १९३९ अन्वयें रचना केलेल्या मुंबई महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करण्याचा अधिकार आहे.

(५) पोट-कलम (४) अन्वयें अपिलांचा निर्णय करतांना, मुंबई महसूल न्यायाधिकरणानें, व्यवहार प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वयें मूळ न्यायालयानें दिलेल्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर केलेल्या अपिलांचा निर्णय करतांना न्यायालयास जे अधिकार असतील ते सर्व अधिकार चालविले पाहिजेत व न्यायालय जी कार्यरीति अनुसरीत असेल तीच कार्यरीति अनुसरली पाहिजे.

९. भागदारी व नरवादारी अधिनियम, १८६२ व मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९, कलम ११७ हीं याअन्वयें रद्द करण्यांत आलीं आहेत. उक्त अधिनियम रद्द करणें यामुळें आणि भागदारी व नरवादारी सत्ताप्रकारांस आनुषंगिक असलेले हक्क नष्ट झाले आहेत असें जाहीर करणारा कोणताहि उपबंध यामुळें— रद्द करणें.

(अ) हा अधिनियम अंमलांत येण्याच्या तारखेपूर्वी संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताहि हक्क, स्वामीत्व किंवा हितसंबंध अथवा प्राप्त झालेलें किंवा पत्करलेलें कोणतेंहि बंधन किंवा जबाबदारी यांस बाध येणार नाहीं ;

(ब) अशा हक्काच्या, स्वामित्वाच्या, हितसंबंधाच्या, बंधनाच्या किंवा जबाबदारीच्या संबंधां-तील कोणत्याहि वैध कारवाईस किंवा इलाजास अथवा अशा तारखेपूर्वी केलेल्या किंवा करूं दिलेल्या कोणत्याहि गोष्टीस बाध येणार नाहीं.

१०. राज्य सरकारास ह्या अधिनियमाचे उपबंध अंमलांत आणण्याकरितां नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम आगाऊ प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत व ते कायम केल्यावर राज-पत्रांत प्रसिद्ध करण्यांत आले पाहिजेत. नियम.

११. ह्या अधिनियमांत वापरण्यांत आलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ यांत त्यांचा जो अर्थ दिलेला असेल तोच असेल. अर्थविवरण.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.